Shareholders can claim their unclaimed dividend by writing to the Company / Registrar and Transfer Agent of the Company viz. TSR Darashaw Consultants Private Limited by enclosing the original cancelled leaflet of the cheque stating the name of first named shareholder as the account holder in case the shares are held in physical form or self attested copy of Client Master List with the updated bank account details, if the shares are held in demat form. Please note that you are requested to send the documents for claiming the dividends by **November 12, 2021**. In case the dividends are not claimed by the said date, the Company would initiate necessary action for transfer of unclaimed dividends and shares held by the concerned shareholders in favour of the IEPF Authority without any further notice, in accordance with the Rules, as under:
- **For shares held in physical form** - New share certificate(s) in lieu of the original share certificate(s) will be issued and transferred in favour of the IEPF Authority on completion of necessary formalities. The original share certificate(s) which stand registered in the name of the shareholder will be deemed cancelled and non-negotiable.
- **For shares held in demat form** - The Company shall inform the Depositories to execute the corporate action and debit the shares lying in your demat account and transfer such shares in favour of the IEPF Authority and credit their demat accounts.

The concerned shareholder(s) are further informed that all future benefits arising on such shares would also be transferred to the IEPF Authority.
Please note that no claim shall lie against the Company in respect of amount of unclaimed dividend and equity shares transferred to the IEPF Authority pursuant to the said Rules.
Shareholders may please note that after the transfer of their shares to the IEPF Demat Account, they may claim from the IEPF Authority both the unclaimed dividend amount(s) and the shares including all benefits accruing on such shares by making an online application in the prescribed e-Form IEPF-5, available on the website **www.iepf.gov.in** and sending the physical copy of the same duly signed (as per the specimen signature recorded with the Company) to the Company at its Registered Office along with the requisite documents enumerated in e-Form IEPF-5. Link of the e-Form IEPF-5 is also available under the 'Investor Relations' section on the website of the Company at **www.rallis.co.in**.
In case of any queries or assistance on the subject matter, the shareholders may contact the Registrar and Transfer Agent of the Company viz. TSR Darashaw Consultants Private Limited, C-101, 1st Floor, 247 Park, Lal Bahadur Shastri Marg, Vikhroli West, Mumbai 400 083, Tel: +91 22 6656 8484, Fax: +91 22 6656 8494, Email: **csg-unit@tcplindia.co.in**, Website: **www.tcplindia.co.in**.
For **Rallis India Limited**
Sd/-
Yashaswin Sheth
Company Secretary
(Nodal Officer)
Place: Mumbai
Date: July 9, 2021



कधी एकदा गळाला मासा लागेल, यासाठी गळ टाकून प्रतीक्षा करणारे गळाला मासा लागला की, खूप आनंदी होतात. नांदेडच्या गोदावरी नदीला पूर आल्यामुळे अनेकांनी पुलावरून गळ टाकून मासेमारी सुरू केली आहे. गळाला अडकलेला मासा छायाचित्रात दिसत आहे.

प्रस्ताव नसतानाही लाभार्थ्यांना खिरापत

परभणी जिल्हा परिषदेतील प्रकार : दहा लाख रुपये वसूल करण्याचे आदेश

अभिमन्यू कांबळे
लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी : जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागांतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी लाभार्थ्यांकडून प्रस्ताव दाखल झाले नसतानाही त्यांना लाभ देण्यात आला असल्याची बाब लेखापरीक्षणात समोर आली असून, या संदर्भातील दहा लाख रुपयांची रक्कम संबधितांकडून करण्याचे आदेश जि.प.ला देण्यात आले आहेत.

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या वतीने २०१६-१७ या वर्षात उपकर योजनेंतर्गत मागासवर्गीयांना पिकोफॉल मशीन पुरवठा करण्याची योजना राबविण्यात आली होती. यासाठी ३३ लाख ९९ हजार ८५० रुपयांचा निधी खर्च करण्यात आला.

याअंतर्गत ४८५ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यातील ३२ लाभार्थ्यांनी पिकोफॉल मशीनचा लाभ मिळावा, यासाठी अर्ज केलेच नव्हते. तरीही त्यांना जि. प.च्या वतीने लाभ देण्यात आला. त्यामुळे या साहित्याची २ लाख २४ हजार ३२० रुपयांची रक्कम संबंधितांकडून वसूल करावी, अशी सूचना राज्य शासनाच्या स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाने केलेल्या लेखा परीक्षण अहवालात करण्यात आली आहे.

याशिवाय ४८५ लाभार्थ्यांची निवड करताना पंचायत समिती स्तरावर दाखल झालेल्या प्रस्तावांची छाननी गटविकास अधिकारी किंवा संबंधित कर्मचाऱ्यांनी केली नसल्याचे समोर आले आहे.

प्रस्ताव परिपूर्ण नसतानाही त्यांना लाभ

- पालम पंचायत समितीला ११ दिवस उशिराने पिकोफॉल मशीन प्राप्त होऊन पं.स.ने जुन्या तारखेत या मशीन मिळाल्याची नोंद घेतली. ही गंभीर बाब असल्याचे अहवालात नमूद केले.
- तसेच जि. प.च्या स्वउत्पन्नातील २० टक्के राखीव निधीमधून मागासवर्गीयांना सेवई मशीन पुरविण्यासाठी २९ लाख ८० हजार ७७० रुपयांचा खर्च करण्यात आला. याअंतर्गत ५४ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यातील २८ लाभार्थ्यांचे प्रस्ताव परिपूर्ण नसतानाही त्यांना लाभ देण्यात आला. त्यामुळे या संदर्भातील ५ लाख ४१ हजार ९४० रुपयांची रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याचे आदेशित करण्यात आले आहे.
- शिवाय ज्या पुरवठादारांकडून या मशीन खरेदी केल्या, त्या पुरवठादाराने जि.प.ला ९० हजारांचा अनामत रकमेचा एफडीआर धनादेश दिला असताना तो जि.प.च्या खात्यावर जमा न करता तसाच ठेवून संबंधितास लाभ पोहोचविण्याचा प्रयत्न जि. प. कर्मचाऱ्यांनी केल्याचे अहवालात नमूद केले आहे.

मिरची कांडप मशीन वाटपातही गडबड

- स्वउत्पन्नातील २० टक्के निधीतील मागासवर्गीय महिलांना मिरची कांडप यंत्र वाटप करण्यासाठी १९ लाख ९९ हजार ९९९ रुपयांची तरतूद मंजूर करण्यात आली होती. त्यातून १५४ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यातील १६८ लाभार्थ्यांच्या अर्जावर गटविकास अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नव्हत्या, तर १८ लाभार्थ्यांचे प्रस्ताव नसतानाही त्यांना मशीन वाटप करण्यात आले. त्यामुळे संबंधितांकडून २ लाख ६० हजार ८७४ रुपयांची रक्कम वसूल करण्याचे जि. प.ला सुचविण्यात आले आहे. या तिन्ही योजनांतर्गत नियमबाह्य पद्धतीने निविदाप्रक्रिया राबविली गेली, असेही ताशेरे लेखापरीक्षणात ओढण्यात आले आहेत.

अपघातात लातूर जिल्ह्यातील एक ठार

लोकमत न्यूज नेटवर्क



फुलंब्री (जि. औरंगाबाद) : ट्रकला कार जोरात धडकून लातूर जिल्ह्यातील व औसा तालुक्यातील मसुरडी येथील महेश काशीनाथ घोडके हा कारचालक जागीच ठार झाला. ही घटना शुक्रवारी सकाळी सात वाजता चौका गावाजवळ घडली. औरंगाबादहून फुलंब्रीकडे जाणारा ट्रक (क्र. एमएच ०४ बीयू ५५५३) चौकानजीक आल्यावर पाठीमागून येणारी कार (क्र. एमएच १२ एनबी ५२५८) या ट्रकला पाठीमागून जोराने धडकली. कारचा वेग जास्त असल्याने समोरचा भाग चुरा होऊन त्यात कारचालक महेश घोडके हे दबले जाऊन जागीच मृत्युमुखी पडले.. फुलंब्री ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून मृतदेह गावी पाठविण्यात आला.

न्यूज Inbox

हिंगोली जिल्ह्यात उसाच्या शेतात गांजाची झाडे जप्त

पोलिसांची कारवाई : आरोपी ताब्यात



शिरडशहापूर (जि. हिंगोली) : वसमत तालुक्यातील मरसूळ शिवारात शुक्रवारी कुरुंदा येथील पोलिसांनी छापा टाकत उसाच्या शेतात लावण्यात आलेली १ लाख १५ हजार रुपये किमतीची व २३ किलो वजन असणारी १० गांजाची झाडे जप्त केली. पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले आहे.

मरसूळ शिवारात पाशू खाँ दौलत पठाण यांची शेती आहे व त्यांनी शेतातील उसामध्ये गांजाची झाडे लावली होती. ही माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी शेतात धाव घेतली असता त्यांना उसाच्या शेतीमध्ये जवळपास १० गांजाची झाडे आढळली. गांजाच्या झाडाचे वजन २३ किलो असून तिची किंमत १ लाख १५ हजार रुपये आहे. ही कारवाई सहायक पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, सपोनि सुनील गोपी नवार, फौजदार सविता बोधनकर, जमादार गजानन भोपे, प्रकाश नेवल, तुकाराम आमले, संतोष पटवे, बबन देवकर, विक्रम राठोड, हिरामण चव्हाण, मस्के यांनी केली. घटनास्थळी मंडळाधिकारी शंकर शिंदे, तलाठी वाघिले, कृषी सहायक लोखंडे आदींनी पंचनामा केला. गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

नांदेडच्या धान्य काळाबाजाराची हिंगोली जिल्ह्यात पुनरावृत्ती

हिंगोलीतही मध्यप्रदेश सरकारचे शिक्के असलेले पोते

लोकमत न्यूज नेटवर्क

नांदेड : राज्यभरात नांदेडच्या शासकीय धान्याचा घोटाळा गाजत असताना शेजारील हिंगोली जिल्ह्यातही त्याची पुनरावृत्ती सुरू आहे. गुरुवारी (दि. ८) हिंगोली पोलिसांनी रेशनचे ७८ क्विंटल धान्य पकडले. या धान्याच्या पोत्यांवर 'मध्यप्रदेश स्टेट सिव्हिल सप्लाय' असे शिक्के होते. विशेष म्हणजे नांदेडात पोलिसांनी पकडलेल्या सहा हजार पोत्यांवरही नेमके असेच शिक्के होते. त्यामुळे धान्याच्या काळ्याबाजाराची ही साखळी एवढ्या मोठ्या कारवाईनंतरही अबाधित आहे.

कृष्णूरच्या इंडिया मेगा ॲग्रो अनाज कंपनीवर पोलिसांनी धाड घालून शासकीय धान्याचा काळाबाजार उघडकीस आणला होता. शासकीय गोदामांतून धान्य घेऊन निघालेले १० ट्रक थेट कंपनीत नेण्यात आले होते. त्यात नांदेडच्या सात आणि हिंगोली जिल्ह्यातील तीन ट्रकचा समावेश होता. त्यात कंपनीचे मालक, पुरवठादार यांसह तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारीही अडकले. त्याच वेळी हिंगोलीच्या पुरवठा अधिकाऱ्यांनी मात्र तातडीने कारवाई केली होती. या प्रकरणात आता 'ईडी'ने प्रवेश केल्यामुळे अनेकांची पाचावर धारण बसली आहे. असे असताना नांदेडसह शेजारील जिल्ह्यांत धान्याचा काळाबाजार सुरूच आहे. गुरुवारी हिंगोली पोलिसांनी काळ्याबाजारात जाणारे ७८ क्विंटल धान्य पकडले. त्याच्या पोत्यांवर 'मध्यप्रदेश स्टेट सिव्हिल सप्लाय' असे शिक्के आहेत. कृष्णूरच्या मेगा कंपनीतही असेच शिक्के असलेले पोते होते. त्यामुळे ही पोती नेमकी येतात कुठून, हा संशोधनाचा विषय आहे. विशेष म्हणजे हिंगोलीतही शासकीय धान्याचा आटा तयार करून विकण्यात येत होता.

कनेरगाव नाका येथे विल्हेवाट

हिंगोली येथील शासकीय धान्य हे कनेरगाव नाका येथील पिठाच्या गिरणीत नेण्यात येत होते. या ठिकाणी दोन ते तीन पिठाच्या गिरण्या असून, धान्याचे पीठ करून ते बाजारात विकण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

पोलीस शिपायाची परभणीत आत्महत्या

लोकमत न्यूज नेटवर्क



परभणी : येथील पोलीस मुख्यालयात कार्यरत रामेश्वर दिलीप बारहाते (३५) या कर्मचाऱ्याने घरातील छतावरील पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी रात्री उघडकीस आली आहे. आत्महत्येचे कारण स्पष्ट झाले नाही.

परभणी शहरातील लक्ष्मीनगर भागात किरायाने राहत असलेले पोलीस शिपाई रामेश्वर दिलीप बारहाते (मूळ गाव सेलू) पोलीस मुख्यालयात नोकरीस होते. बारहाते यांनी त्यांच्या घरातील छतावरील पंख्याला गळफास लावून आत्महत्या केल्याची बाब गुरूवारी रात्री १० वाजता उघडकीस आली. रामेश्वर बारहाते यांच्या या घटनेची नानलपेठ पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.



शुक्रवारी जालना येथे जप्त केलेल्या गुटख्यासह पोलीस कर्मचारी.

जालन्यात गुटखा पकडला

कारवाई : ३० लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

जालना : पुणे येथून राज्यात बंदी असलेला गुटखा घेऊन जाणाऱ्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शुक्रवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास ताब्यात घेतले. संजय देवराव मडावी (रा. खळद, ता. पुरंदर, जि. पुणे), असे संशयिताचे नाव आहे. त्याच्याकडून २० लाख ६० हजार ६४० रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. ही कारवाई जालना - देऊळगाव राजा रोडवरील गोंदेगाव शिवारात करण्यात आली.

पुणे येथून आयशरने (क्र. एमएच १२ - ईक्यू ७९३६) यवतमाळ येथे गुटखा नेण्यात येत असल्याच्या मिळालेल्या माहितीवरुन जालना - देऊळगाव रोडवरील गोंदेगाव शिवारात पोलिसांनी दोन पथके तैनात केली. त्याचवेळी जालन्याकडून येत असलेल्या या वाहनाची पोलिसांनी तपासणी केली . त्या वेळेस राजनिवास गुटखा पान मसाल्याची १२,७२० पाकिटे आणि एक्सएल ०१ जाफराणी जर्दाची १२,७३० पाकिटे, असा एकूण २० लाख ६० हजार ६४० रुपयांचा गुटखा व १० लाख रुपये किमतीचे आयशर, असा एकूण ३० लाख ६० हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी अन्न औषध प्रशासन विभागाचे निरीक्षक कुलकर्णी यांच्या फिर्यादीवरून वाहन चालक संजय देवराव मडावी व मालक मनप्रीत सरदार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

नियामक समित्यांनी खातरजमा केल्यानंतरच निकाल

तोडगा : निकालांचा गोंधळ थांबविण्यासाठी विद्यापीठाचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या निकालांचा गोंधळ थांबविण्यासाठी विद्यापीठाने आता 'निकाल नियामक समित्या' स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून, नियामक समित्यांनी खातरजमा केल्यानंतरच परीक्षा विभागाला यापुढे विविध विद्याशाखांचे निकाल जाहीर करण्याची मुभा राहील.

उच्चशिक्षण विभागाच्या सूचनेनुसार कोरोना महामारीच्या काळात राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांनी ऑनलाइन परीक्षांचे आयोजन केले. यामध्ये सुरुवातीला थोड्याफार तांत्रिक अडचणी सोडल्या तर राज्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे ऑनलाइन परीक्षेत यशस्वी राहिले आहे. मात्र, यावेळी बी.कॉम प्रथम सत्र वर्षाच्या कॉम्प्युटर ॲप्लिकेशन या विषयाच्या पेपरमध्ये ११ हजारांपैकी अवघे १८४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामुळे विद्यार्थी, पालक, विद्यार्थी संघटनांनी ओरड केली. विशेष म्हणजे, परीक्षा विभागाने या विषयाचा सलग तीनवेळा वेगवेगळा निकाल जाहीर केल्यामुळे गोंधळात वाढ झाली.

दरम्यान, कुलगुरु डॉ. प्रमोद येवले यांनी तथ्यशोधनासाठी तडकाफडकी एक उपसमिती नेमली. या समितीने केलेल्या शिफारसीनुसार परीक्षा मंडळाच्या (बीओई) बैठकीत अन्य विषयांच्या गुणांच्या सरासरीएवढे गुणदान करून अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार फेरनिकालमध्ये दहा हजार ३३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

तथापि, जुन्या विद्यापीठ कायद्यामध्ये निकाल नियामक समितीची तरतूद होती. ती आता नवीन कायद्यात नाही. मात्र, कुलगुरु आपल्या अधिकारात अशी समिती स्थापन करू शकतात. त्यानुसार सर्व विद्याशाखांच्या अशा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या समितीमध्ये संबंधित विद्याशाखेचे अधिष्ठाता, त्याच विद्याशाखेचे वरिष्ठ प्राध्यापक व परीक्षा नियंत्रक यांचा समावेश आहे. प्रत्येक विद्याशाखेसाठी अशी समिती कार्यरत राहील. निकाल जाहीर करण्यापूर्वी तो नियामक समितीसमोर पडताळणीसाठी ठेवला जाईल. समिती सदस्य गुणदानाची पद्धत अर्थात विद्यार्थ्यांना जास्त गुण अथवा कमी गुण देण्यात आले आहेत का? विहित पॅटर्ननुसार प्रश्नपत्रिका काढण्यात आली होती का? योग्य प्रकारे उत्तरपत्रिकांची तपासणी करण्यात आली आहे का? आदींची बारकाईने पडताळणी करतील. पडताळणी केल्यानंतरच निकाल जाहीर करण्यास परीक्षा व मूल्यमापन विभागाला हिरवा कंदील दाखवला जाईल.

बी.कॉम.चा चौथ्यांदा निकाल जाहीर

बी.कॉम. प्रथम वर्षाच्या कॉम्प्युटर ॲप्लिकेशन या विषयाचा दोन दिवसांपूर्वी चौथ्यांदा निकाल जाहीर करण्यात आला. या विषयाची परीक्षा ११ हजार ३०५ विद्यार्थ्यांनी दिली होती. सुरुवातील फक्त १८४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. मर्यादेपेक्षा जास्त विद्यार्थी नापास झाल्यास सरासरी गुणानुसार विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्याचे अधिकार परीक्षा मंडळाला आहेत. त्यानुसार आता दहा हजार ३३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

आजचे भविष्य

शनिवार, दि. १० जुलै २०२१

राष्ट्रीय भारतीय सौर दिनांक आषाढ १९, १९४३. **तिथी :** ज्येष्ठ कृष्ण अमावस्या. श्री शालिवाहन शके १९४३. प्लव नाम संवत्सर, **नक्षत्र :** दुसऱ्या दिवशी उत्तर रात्री १.०२ वाजेपर्यंत पुनर्वसू. त्यानंतर पुष्य. **रास :** सायंकाळी ६.३८ वाजेपर्यंत मिथुन. त्यानंतर कर्क. **आज :** सामान्य दिवस. सकाळी ६.४७ वाजेपर्यंत अमावस्या.
राहू काळ : सकाळी ९ ते १०.३० (राहू काळात महत्त्वाची कामे टाळा.)

मेष- तडकाफडकी कामे होतील. काही कामे फायदेशीर ठरतील तर काही मनाविरुद्ध घटना घडतील. आर्थिक परिस्थिती ठिकठाक राहील. व्यवसायात मोठी उलाढाल होईल. नोकरीत अस्थिरता जाणवेल. मित्र, नातेवाईक यांच्याशी संपर्क राहील. हातून पूजापाठ घडेल.

तूळ- नशिबाची साथ मिळेल. त्यामुळे कामात यश मिळेल. तुमच्या कामाचे कौतुक होईल. देवदर्शन करण्यासाठी प्रवास होतील. कामाच्या ठिकाणी सहकारी मित्रांशी वाद होतील. खर्चाचे नियोजन करावे. विविध मार्गांनी पैसे मिळतील.

वृषभ- अचानक धनलाभ होईल. जीवनसाथी चांगली साथ देईल. भावंडांशी सख्य राहील. आर्थिक व्यवहार करताना खबरदारी घ्यावी. देवाणघेवाण करण्यासाठी काळ चांगला आहे. कुणाला मदत करताना खरेच त्याला गरज आहे का याची खात्री करा.

वृश्चिक- महत्त्वाच्या कामात अडचणी येतील. पोटाचा त्रास होईल. वाहन जपून चालवा. धार्मिक कार्यात भाग घ्याल. जोडीदाराशी वादविवाद होण्याची शक्यता आहे. कागदोपत्री व्यवहार जपून करा. आवडत्या छंदासाठी आवर्जून वेळ काढा.

मिथुन- मन प्रसन्न राहील. आरोग्य चांगले राहील. कामात उत्साह राहील. रेंगाळलेली कामे पूर्ण होतील. घरात आनंदी वातावरण राहील. आवडते पदार्थ ताटात दिसतील. गाफील राहून व्यवहार करू नका. जोडीदाराशी मधुर संबंध राहतील. कायद्याचे बंधन पाळा.

धनू- नोकरीत चांगली परिस्थिती राहील. सहकारी मदत करतील. तुमचा सल्ला अचूक ठरेल. जोडीदाराशी मधुर संबंध राहतील. छोटे-मोठे वाद सामोपचाराने मिटवा. मानसन्मान मिळेल. आर्थिक लाभ होईल. मुलांच्या बाबतीत उदार धोरण ठेवलेले बरे..

कर्क- पूजापाठात मन रमेल. आध्यात्मिक अनुभव येतील. कायद्याची बंधने पाळावीत. आर्थिक आवक सामान्य राहील. प्रवास करावा लागेल. मुलांना यश मिळेल. दगदग, धावपळ करू नका. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

मकर- जी कामे मागे पडली होती ती सहज पूर्ण होतील. त्यामुळे उत्साह वाढेल. नोकरीत तुमचा शब्द पाळला जाईल. आरोग्याची काळजी घ्या. देवाण घेवाण करण्यासाठी अनुकूल काळ नाही. आर्थिक स्थिती चांगली राहील.

सिंह- अनेक कामे तडफेने हातावेगळी कराल. नोकरीत चांगली परिस्थिती राहील. सर्वांचे सहकार्य मिळेल. त्यामुळे उत्साह वाढेल. आर्थिक आवक चांगली राहील. प्रवास होतील. खरेदीचा आनंद लुटता येईल. नातेवाईकांशी वाद होतील. व्यवसायात धाडसी निर्णय घेऊ नका.


कुंभ- लेखन, वाचन यात मन रमेल. नवीन व्यवसायासाठी मदत मिळेल. त्यात यश मिळेल. योग्य ती गुंतवणूक होईल. मुलांच्या यशामुळे आनंद होईल. नोकरीत सामान्य परिस्थिती राहील. सकारात्मक विचार करा. कामाचा ताण वाढेल. त्याचे व्यवस्थापन कौशल्यपूर्वक कराल.

कन्या- तुमच्या बोलण्याची छाप पडेल. लोक तुमचे म्हणणे ऐकून घेतील. कामात मन लागेल. नशिबाची साथ मिळेल. व्यवसायात भरभराट होईल. नोकरीत चांगली स्थिती राहील. काहींना सुखसोयी उपलब्ध होतील. आहार विषयक नियम, पथ्यपाणी यांचे पालन करा.

मीन- व्यवसायात विक्री चांगली होईल. हाती पैसा येईल. नोकरीत चांगली परिस्थिती राहील. मन आनंदी राहील. कामात बदल होईल. जीवनसाथी चांगली साथ देईल. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. मित्र, नातेवाईकांची काळजी वाटत राहील.

-विजय देशपांडे (ज्योतिष विशारद)

शब्दकोडे क्र. ४४



आडवे शब्द - १. "पानिपत" कादंबरीचे लेखक, ५. काम करणारा, ८. कापूस, ११. सोने, १२. गदारोळ, १३. "चाट" ची चव, १५. रावण, १६. वेदनादायक, दुःखद, १७. लागण, १८. कामाचा कंटाळा येतो तो, १९. एक दिशा, २१. मलीन, २३. युद्धभूमी, २५. मदत, २८. साठ वर्षे पूर्ण होणे, ३१. मोजण्याची पट्टी, ३३. ताकद असलेला, ३४. उकल, समाधान, ३५. आवाज देणे, ३७. जोराचा वारा, ३९. बाता मारणे, ४१. जेथील बाजारात झुमका पडला ते उत्तर प्रदेशातील गाव, ४२. नर्मदा नदी, ४३. काहीही किंमत नसलेला, ४६. नशीब (इंग्रजी), ४७. रंग (इंग्रजी), ४८. एक रंग, ५०. एक साथीचा आजार, ५२. वंशज (उर्दू), ५४. काहीही कारण नसताना, ५६. पावसाबेत खातात तो, ५७. मदत करणारा, ५९. दाखला, ६२. अमेरिका-कॅनडातील एक धबधबा, ६३. विधानसभा सदस्य, ६५. तळहात (इंग्रजी), ६६. बागेत श्रम करणे, ६९. समजा, ७०. वातावरण, ७२. व्यवस्था, ७४. यमाचे राज्य, ७५. एकाच सुरात, ७६. कारस्थान, ७७. सारखेपणा, ७८. कपाळ, ७९. हो म्हणणे.

उभे शब्द - १. बाबा आमटे यांचे पुत्र, २. कुत्रा, ३. रीतसर, कायदेशीर, ४. बालपण, ,५. वडिलांचे बंधू, ६. पुरुष (हिंदी), ७. बांधकामाचे नकाशे काढणारा, ८. चहा ज्यातून पितात ते पात्र, ९. पूर्वीच्या काळी गावचा प्रमुख, १०. नेहमी, १४. तोंडाचा पट्टा, २०. राजाचे निवासस्थान, २२. तरबेज, २४. एक उद्योगपती घराणे, २६. पोळी यावर भाजतात, २७. कुलंगडी, २९. फळातील द्रव, ३०. दया, ३२. रखवालदार, ३३. शक्ती, ३४. हैदराबादचा भूतपूर्व संस्थानिक, ३६. सध्याचे युग, ३८. औषध, ४०. रतीचा पती, ४१. शक्ती असलेला, ४३. पलंगासारखे बैठकीतील आसन, ४४. खोल (इंग्रजी), ४५. चव घेणे, ४८. ओकेबोके, ४९. फळातील मगज, ५१. कीटक, ५३. वेळ, ५४. राग, आसक्ती यांचा त्याग, ५५. आईची आई (हिंदी), ५८. धोका देणारा, ५९. वय (उर्दू), ६०. मोठा भाऊ, ६१. सैन्याची गर्जना'....'महादेव, ६२. देवाचे नाव घेणे, ६३. हल्ली (हिंदी), ६४. मनाची एक उपमा, ६५. पाप, ६७. नेहमी, ६८. प्रेम, माया, ७१. गायीचे पिलू, ७३. घर बांधताना वापरतात ती, ७५. एक इंग्रजी पेहराव.

शब्दकोडे क्र. ४३ चे उत्तर



अर्ध्या मराठवाड्यात पावसाची हजेरी; बळीराजा सुखावला

औरंगाबाद : गत चोवीस तासांत अर्ध्या मराठवाड्यात पावसाने हजेरी लावली. त्यामुळे बळीराजा सुखावला असून, खरीप पिकांना संजीवनी मिळाली आहे.

जालना शहरासह भोकरदन तालुक्यातील राजूर, हसनाबाद, धावडा, बदनापूर तालुक्यातील दाभाडी व परिसरातही पाऊस झाला. जिल्ह्यात शुक्रवारी सकाळी ८ वाजण्यापूर्वीच्या २४ तासात सरासरी १३.९० मिमी पाऊस झाला. सर्वाधिक जालना तालुक्यात ३४.५० मिमी, तर मंठा तालुक्यात सर्वात कमी ०.८० मिमी पावसाची नोंद झाली. जिल्ह्यात आतापर्यंत वार्षिक सरासरीच्या तुलनेत २३६.७० मि. मी. पाऊस झाला आहे. या पावसामुळे खरिपातील पिकांना जीवदान मिळाले आहे.

बीड जिल्ह्यात आष्टी, शिरूर, बीड तालुक्यांत गुरुवारी सायंकाळनंतर चांगला पाऊस झाला. तर शुक्रवारी अंबाजोगाई, बीड, शिरूर, गेवराई तालुक्यांत हजेरी लावली. पावसाने राडी सर्कलमधील उसाचे मोठे नुकसान झाले. शुक्रवारी हिंगोली शहर वगळता ग्रामीण भागात दुपारी दोन ते अडीच वाजेच्या सुमारास आभाळ दाटून आले होते. जिल्ह्यातील वसमत, आखाडा बाळापूर, कडोळी, नर्सी नामदेव, वारंगा, येहळेगाव, डोंगरकडा, जवळा पांचाळ, जवळा बाजार, नांदापूर आदी गावांत शुक्रवारी दुपारच्या वेळेस जोरदार पाऊस झाला.

शेतात पाणी साचले

परभणी शहरात शुक्रवारी दुपारी २ च्या सुमारास पावसाला सुरुवात झाली. जवळपास ४० मिनिटे हा पाऊस सुरु होता. पूर्णा तालुक्यातील ताडकळस, सेलू तालुक्यातील वालूर, हिस्सी, मानवत तालुक्यातील ताडबोरगाव, रामपुरी तसेच परभणी तालुक्यातील झरी व पोखर्णी येथे चांगला पाऊस झाला. वालूर परिसरात पावसाने शेतांमध्ये पाणी साचले होते.

Golden 50 years WOCKHARDT LIFE WINS

वोक्हार्ट लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: डी-४ एमआयडीसी, चिखलठाणा, औरंगाबाद – ४३१ ००६
टेलिफोन: ९१-२४०-६६९४४४४ **फॅक्स:** ९१-२४०-२४८९२१९
जागतिक मुख्य कार्यालय: वोक्हार्ट टॉवर्स, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
सीआयएन : L24230MH1999PLC120720
ई-मेल आयडी: investorrelations@wockhardt.com **वेबसाइट:** www.wockhardt.com

वार्षिक सर्वसाधारण सभा, बुक क्लोजर आणि ई-मतदानासंबंधीची नोटीस

याद्वारे नोटीस देण्यात येत आहे की कंपनीच्या सभासदांची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) सोमवार, ०२ ऑगस्ट, २०२१ रोजी सकाळी ११ वाजता (भारतीय प्रमाण वेळ) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी') द्वारे/ इतर दृकश्राव्य साधनांद्वारे ('ओएव्हीएम'), दिनांक २७ मे, २०२१ च्या एजीएम नोटिशीत नमूद केलेले कामकाज करण्यासाठी घेतली जाईल.

कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालयाचे दि. ५ मे, २०२० चे सामान्य परिपत्रक क्र. २०/२०२० नुसार, ज्याचे वाचन दि. ८ एप्रिल, २०२० चे सामान्य परिपत्रक क्र. १४/२०२० आणि दि. १३ एप्रिल, २०२० चे सामान्य परिपत्रक क्र. १७/२०२० आणि सामान्य परिपत्रक दि. १३ जानेवारी, २०२१ आणि सेक्युरिटीज एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांच्या दि. १२ मे, २०२० च्या परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ आणि परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२१/११ दि. १५ जानेवारी, २०२१ बरोबर करायचे आहे, एजीएमची नोटीस व वार्षिक अहवाल, त्याचबरोबर आर्थिक वर्ष २०२०-२१ साठीच्या लेखापरीक्षित आर्थिक अहवालासह, हे ज्या सभासदांचे ई-मेल आयडी कंपनीकडे किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट(स) यांच्याकडे नोंदविलेले आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आलेले आहेत. वार्षिक अहवाल आणि एजीएम नोटीस सभासदांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्याचे काम **९ जुलै, २०२१** रोजी पूर्ण करण्यात आले आहे.

कायद्याच्या कलम १०८ च्या तरतुदींच्या पालनानुसार, ज्याचे वाचन कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २०, सुधारणा केल्यानुसार, आणि सेबी लिस्टिंग रेग्युलेशनसच्या रेग्युलेशन ४४ बरोबर करायचे आहे, कंपनी आपल्या सर्व सभासदांना (ज्यांनी प्रत्यक्ष स्वरूपात किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात भाग धारण केलेले आहेत) २२ व्या एजीएममध्ये विचारार्थ घेतल्या जाणाऱ्या ठरावांच्या बाबतीतील त्यांचे मतदान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने, नॅशनल सेक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ('एनएसडीएल') द्वारे पुरविल्या गेलेल्या ई-मतदान यंत्रणेद्वारे ('रीमोट ई-मतदान') करण्याची सुविधा देत आहे.

तसेच, सभासदांना हेही कळविण्यात येत आहे की :

अ) रीमोट ई-मतदानाचा कालावधी **बुधवार, २८ जुलै, २०२१** रोजी **सकाळी ९.०० वाजता** (भारतीय प्रमाण वेळ) सुरू होईल व **रविवार, १ ऑगस्ट, २०२१** रोजी **संध्याकाळी ५.०० वाजता** (भारतीय प्रमाण वेळ) संपेल. या कालावधीत, कंपनीच्या ज्या सभासदांनी कट-ऑफ तारखेला, म्हणजेच २६ जुलै, २०२१ रोजी, त्यांचे भाग प्रत्यक्ष किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात धारण केलेले आहेत, ते त्यांचे मत रीमोट ई-मतदान पद्धतीद्वारे नोंदवू शकतील.

ब) ज्या व्यक्तीचे नाव सभासदांच्या रजिस्टरमध्ये/ लाभार्थी मालकांमध्ये कट-ऑफ तारखेच्या दिवशी म्हणजेच सोमवार, २६ जुलै, २०२१ रोजी असतील तर ते रीमोट ई-मतदानाच्या सुविधेचा लाभ घेण्यासाठी किंवा एजीएममध्ये मतदान करण्यासाठी पात्र असतील.

क) रीमोट ई-मतदानाला रविवार, १ ऑगस्ट, २०२१ रोजी संध्याकाळी ५.०० (भारतीय प्रमाण वेळ) नंतर परवानगी दिली जाणार नाही.

ड) ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षासाठीच्या वार्षिक अहवालाची प्रत आणि एजीएमची नोटीस, ज्यात, इतर मुद्यांबरोबरच, रीमोट ई-मतदान/ई-मतदानाच्या प्रक्रियेबद्दल आणि पद्धतीबद्दल माहिती दिलेली आहे, ज्या सभासदांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे/डिपॉझिटरीजकडे ०२ जुलै, २०२१ रोजी नोंदविलेले असतील त्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आले आहे.

इ) ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षासाठीचा वार्षिक अहवाल आणि एजीएमची नोटीस कंपनीच्या वेबसाइटवर पुढील लिंकवर उपलब्ध आहे: http://www.wockhardt.com/pdf/ANNUAL%20 REPORT% 2020 20-2021.pdf आणि http://www.wockhardt.com/files/Wockhardt-AGM-Notice-2020-21.pdf

वोक्हार्ट फाउंडेशनद्वारे राबविण्यात आलेल्या सीएसआर उपक्रमांची प्रत तुमच्या संदर्भासाठी पुढील लिंकवर उपलब्ध करून देताना आम्हाला आनंद होत आहे: http://www.wockhardt.com/files/Wockhardt-Foundation-Annual-Report-2020-21.pdf

२२ व्या एजीएमची नोटीस एनएसडीएलच्या वेबसाइटवरील https://www.evoting.nsdl.com या लिंकवर देखील उपलब्ध आहे. एजीएमच्या नोटीसची प्रत बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवर (www.bseindia.com) येथे आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांच्या वेबसाइटवर (www.nseindia.com) येथेही उपलब्ध आहे, जेथे कंपनीचे प्रतीभुती (शेअर्स) नोंदविलेले आहेत.

फ) जर एखादी व्यक्ती, एजीएमची नोटीस पाठविल्यानंतर कंपनीची सभासद झालेली असेल आणि अशा व्यक्तीने कट-ऑफ तारखेला म्हणजेच २६ जुलै, २०२१ रोजी भाग धारण केलेले असतील, तर अशी व्यक्ती evoting@nsdl.co.in येथे विनंती पाठवून ई-मतदानासाठीचे लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकेल. जर त्या सभासदाने यापूर्वीच रीमोट ई-मतदानासाठी एनएसडीएलकडे नोंदणी केलेली असेल, तर तो त्याचा सध्या अस्तित्वात असलेला यूजर आयडी आणि पासवर्ड रीमोट ई-मतदानाद्वारे आपले मत नोंदविण्यासाठी वापरू शकेल. रीमोट ई-मतदानासाठी, कृपया एजीएमची नोटीस पहावी.

ग) ज्या सभासदांनी त्यांचे मत रीमोट ई-मतदानाद्वारे नोंदविलेले आहे ते एजीएमला हजर राहू शकतील, परंतु त्यांना एजीएममध्ये त्यांचे मत पुन्हा नोंदवता येणार नाही. रीमोट ई-मतदानाद्वारे आपले मतदान न केलेले परंतु एजीएमला उपस्थित असणारे सभासद हे एजीएममध्ये मतदान करण्यासाठी पात्र असतील.

ह) भागधारकांचे मतदानाचे हक्क हे कट-ऑफ तारखेला कंपनीच्या पेड-अप इक्विटी भाग भांडवलामधील त्यांच्या भागांच्या प्रमाणात असतील.

जर रीमोट ई-मतदानाबाबत कोणतेही प्रश्न/समस्या असतील, तर सभासदांनी www.evoting.nsdl.com येथील सभासदांसाठीच्या फ्रीक्वेन्टली आस्कड क्वेश्चन्स (एफएक्यू) आणि डाऊनलोड सेक्शनमध्ये सभासदांसाठी उपलब्ध असलेले ई-मतदान यूजर मॅन्युअल (उपभोक्ता पुस्तिका) पहावे किंवा श्रीमती सोनी सिंह, यांच्याशी ई-मेल आयडी: evoting@nsdl.co.in वर येथे संपर्क साधावा किंवा टोल फ्री क्रमांक १८०० १०२० ९९० /१८०० २२४ ४३० वर संपर्क साधावा.

कायद्यातील कलम ९१ मधील तरतुदींच्या पालनानुसार, ज्यांचे वाचन कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम १० आणि सेक्युरिटीज ॲंड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲंड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स मधील रेग्युलेशन ४२, २०१५ ('सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स'), बरोबर करायचे आहे, सभासदांचे रजिस्टर (इक्विटी व प्रेफरन्स) मंगळवार, २७ जुलै, २०२१ ते सोमवार, २ ऑगस्ट, २०२१ (दोन्ही दिवस समाविष्ट) या कालावधीत एजीएमच्या उद्देशासाठी बंद राहतील.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांच्या आदेशानुसार
सही/-
गजानंद साहू
कंपनी सेक्रेटरी

ठिकाण : मुंबई
तारीख : १० जुलै, २०२१